**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाला २६ सप्टेंबरपासून सुरुवात

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने अखिल भारतीय विद्यापीठ संघाकडून मान्यता प्राप्त कलाप्रकारांकरिता व नियमानुसार आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव स्पर्धेचे आयोजन दि. २६ ते २९ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला या ठिकाणी करण्यात आले आहे. सदर स्पर्धेची माहितीपुस्तिका, नियमावली, सहभागी कलावंतांचे ओळखपत्र आणि महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापकाने करावयाची कार्यवाही, स्पर्धेसंदर्भात सविस्तर वेळापत्रक आणि विविध कलाप्रकारांसाठी असलेले नियम व विनियमावली, युवा महोत्सव बाबतचे नियम आदी माहिती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व शैक्षणिक विभागांचे सर्व विभागप्रमुख यांना पत्राद्वारे व ई-मेलद्वारे पाठविण्यात आलेली आहे. याशिवाय सदर संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरील स्टुडन्ट डेव्हलपमेन्ट मधील स्टुडन्ट डेव्हलपमेन्ट लेटर २०१८ या शिर्षामध्ये देण्यात आली आहे. याबाबत सर्व महाविद्यालयांनी तसेच विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावयाची असून त्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

### कार्यक्रमाचे वेळापत्रक

दि. २६ सप्टेंबर, २०१८ रोजी दु. ११.०० वाजतापासून लोकनृत्य, शास्त्रीय गायन, एकांकिका, स्किट व माईम, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा व कोलाज इ. स्पर्धा संपन्न होतील.

दि. २७ सप्टेंबर, २०१८ रोजी स. ८.३० वाजतापासून शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, भारतीय समूहगान, सुगम संगीत, एकांकिका, स्किट व माईम, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्पॉट पेंटींग व पोस्टर मेकिंग इ. स्पर्धा संपन्न होणार असून दु. ११.०० वाजता क्विज लेखी परीक्षा घेण्यात येईल.

दि. २८ सप्टेंबर, २०१८ रोजी स. ८.३० वाजतापासून लोकनृत्य, भारतीय समूहगान, सुगम संगीत, एकांकिका, स्किट व माईम, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा, कार्टुनिंग व क्ले-मॉडलिंग व क्विज अंतीम फेरी इ. स्पर्धा होतील.

दि. २९ सप्टेंबर, २०१८ रोजी स. ८.३० वाजतापासून लोकनृत्य, फोक ऑर्केस्ट्रा, वेस्टर्न (पाश्चिमात्य सोलो व ग्रुप), सुगम संगीत, ताल वाद्य, स्वर वाद्य, भारतीय समुहगान, एकांकिका, स्किट व माईम, मिमिक्री व रांगोळी इ. स्पर्धा संपन्न होतील.

शनिवार दि. २९ सप्टेंबर, २०१८ रोजी सायं. ५.०० वाजता स्व. डॅडी देशमुख खुला रंगमंच, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे समारोप समारंभ होईल.

सर्व महाविद्यालयांशी संबंधित विद्यार्थ्यांनी व संबंधितांनी याची नोंद घ्यावयाची असून त्याप्रमाणे सहभागा संदर्भात व सादरीकरणा संदर्भात कार्यवाही करावयाची आहे. अधिक माहितीकरिता विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे (९५०३४५७५४६), श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे (९९६०२९६१३६) किंवा त्याच महाविद्यालयातील डॉ. किशोर देशमुख (९३७३१२११२८) व प्रा. हर्षवर्धन मानकर (७९७२२३५३६०) यांचेशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,                                                                **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                दि. १८/०९/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी